महा मेट्रो

NAGPUR METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

# महा मेट्रो व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीक्षित यांना प्रतिष्ठित आयआयबीईतर्फे लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार

उद्या मुंबई येथील कार्यक्रमात पुरस्कार वितरण, डॉ. दीक्षित यांचा होणार सत्कार



नागपूर १४ :  उद्या दिनांक १५ जुलै रोजी इंडियन इन्स्टिट्यूशन ऑफ ब्रीज इंजिनीअर्सच्या (आयआयबीई- IIBE) वतीने राष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात नि:स्वार्थ सेवा केल्या बद्दल महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना प्रतिष्ठित “विशेष लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार”  प्रदान करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील विकासभारणीच्या कार्यात महत्वाकांक्षी अश्या नागपूर मेट्रो आणि पुणे मेट्रोसारख्या प्रकल्पांची यशस्वीपणे निर्मिती करून, महाराष्ट्राच्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीत तसेच विकासात्मक कार्यात ऐतिहासिक सकारात्मक बदल घडवून आणले आणि भारतासह आशिया खंडात नावाजले जातील असे मानांक कायम केले.

डॉ दीक्षित यांना हा पुरस्कार उल्लेखनीय आहे कि, महा मेट्रोला नुकतेच आशिया खंडातील सर्वात लांब पुलाचे बांधकाम केल्याबद्दल प्रतिष्ठित आशिया आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तर्फे प्रमाणपत्र केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले होते आणि या करता श्री. गडकरी यांनी  महा मेट्रोच्या कार्याचे विशेष कौतुक केले. या व्यतिरिक्त मागील महिन्यात कॉन्फडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स च्या (केट) वतीने  डॉ. ब्रिजेश दीक्षित यांना "भामाशाह" पुरस्कार देऊन त्यांचा नागरी सत्कार देखील करण्यात आला होता.

महा मेट्रोच्या वतीने नागपूर आणि पुणे शहरांमध्ये मेट्रो रेल प्रकल्प राबविण्यात येत असून या ठिकाणी महा मेट्रोने मेट्रोचे संचालन देखील सुरु केले आहे. नागपुरात मेट्रो प्रकल्पासह सेंट्रल रॉड फंड अंतर्गत विविध विकास कामे महा मेट्रो राबवत आहे. नागपूर आणि पुणे शिवाय, नाशिक शहराकरिता मेट्रो नियो प्रकल्पाचे नियोजन केले

आहे. तसेच ठाणे शहराकरिता मेट्रो रेल प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे.

महाराष्ट्र राज्याशिवाय तेलंगणा राज्यातील वारंगल शहराकरिता देखील महा मेट्रोने प्रकल्पाचा विस्तृत आराखडा तयार केला आहे. तसेच नवी मुंबई येथे सिडको राबवत असलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाचे संचालन करण्याकरिता १० वर्षाच्या कालावधीकरिता महा मेट्रोची नियुक्ती करण्यात आली असून त्या ठिकाणी देखील गतीने कार्य महा मेट्रोच्या वतीने पूर्ण करण्यात येत आहे. महा मेट्रोच्या कार्याची नोंद देशातील अनेक संघटनानी घेतली असून डॉ. दीक्षित यांना विशेष लाइफ टाईम अचिव्हमेंट पुरस्कार महा मेट्रोच्या कार्याची पावती आहे.